

वर्ष पहिले. अंक नववा.
मार्च २०१३

इत्यर्थ
वर्ष पहिले अंक नववा
फेब्रुवारी २०१३

संपादक मंडळ
नाम गुम जायेगा: ठाणे
सृजा: औरंगाबाद
तनवीर सिद्दिकी : छत्तीसगढ

इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यात व्यक्त केलेली मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

©लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित. प्रकाशनाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानकडे सुरक्षित. या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचा उपयोग किंवा पुअनर्मुद्रण करण्याआधी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवष्यक आहे.

संपर्क : ईसाहित्य प्रतिष्ठान
जी ११०२
अकरावा मजला
ईटर्निटी
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे
ठाणे
४००६०४
मो: ९८६९६७४८२०

वेबसाईट: www.esahity.com/
etyarth.blogspot.in

ईमेल: etyarth.esahity@gmail.com
esahity@gmail.com

# संपादकीय

काही शब्द, त्यांचे अर्थ, आणि काही अशी नाती आताशा जाणवत आहेत ज्यांना व्यक्त होण्यासाठी अक्षरांची गरजच नाही मुळी.. इत्यर्थचा हा अंक मनापासून आणला आहे. यात असलेला प्रत्येक लेख मनाच्या गाभ्यातून डोकावल्यासारखा दिसतो आहे. त्यामुळे हे संपादकीयही शांततेच्या गाभाऱ्यात ध्यानस्थ बसण्याचं मनात घेऊन आहे... म्हणून यात अगदी म्हणजे अगदी इतकंच.

लोभ असावा.

सृजा
इत्यर्थ – ईसाहित्य प्रतिष्ठानकडून

ChristianImages.net

# अनुक्रम


| | |
|---|---|
| महिलांवरील अत्याचार:कायदा की मानसिकता? | संहिता हिस्वनकर |
| पूजाच्या फेसबुक अकाऊंट मधे शिरलेला आत्मा | अविनाश कुलकर्णी |
| प्रेमाची धमाल गोष्ट | मच्छिंद्र म्हात्रे |
| झाडांना धडा | शामला क्षीरसागर |
| टूर द पंजाब | श्रीधर पाठक |

# महिलांवरील अत्याचार: कायदा की मानसिकता?

पिता रक्षती कौमार्ये, भर्ता रक्षती यौवने
रक्षन्ति स्थविरे पुत्राः न स्त्री स्वातंत्र्य मर्हति॥

ऐकलंय? ऐकलंच असणार! भारतीय संस्कृतीच्या प्रत्येक उपासकानं काळजाशी घट्ट बांधून ठेवलेलं सुभाषित आहे हे. आणि जो तो तिच्या अब्रूची लक्तरं वेशीवर टांगत सुटलाय. मनु जिला "जबाबदारी" म्हणत होता आज तिलाच त्याचे वंशज "वस्तू" बघत संबोधत आहेत. आणि वस्तू म्हणूनच तिला उपभोग घेत आहेत आज आपण सारेच इथे आहोत. महिलांवरील अत्याचारांबद्दल चर्चा घडते आहे आणि मी एक गोष्ट सतत लक्षात घेते आहे. खूपश्या लोकांनी महिलांवरील अत्याचार=बलात्कार असं समीकरण मांडलेलं आहे. कायदा की मानसिकता या वादात माझी बाजू मांडण्याआधी मला एका गोष्टीवर उजेड टाकायचा आहे.

मी एक स्त्री आहे आणि आईच्या गर्भातला भ्रूण असण्यापासून ते शेवटचा श्वास घेईपर्यंत मी अत्याचार सहन करतेच आहे. स्त्री भ्रूण हत्या, मुलगा-मुलगी यांतला भेदभाव, बालिकांवरचे अत्याचार, छेडछाड, विनयभंग, बलात्कार, सामुहीक बलात्कार, घरगुती हिंसाचार, हुंडा-हुंडाबळी हे सारेच अत्याचारच तर आहेत. एका साधारण स्त्रीच्या आयुष्यात बलात्कार हा एकच अत्याचार नाही. कित्येक अशा स्त्रीया आहेत ज्यांच्यासाठी छातीत भरला जाणारा प्रत्येक श्वास एक अत्याचार बनतो आहे.

१६ डिसेंबर २०१२ रोजी अशीच एक मुलगी पूर्ण कपड्यांनिशी बसमध्ये चढली आणि पाऊण तासात निर्वस्त्र बाहेर फेकली गेली. सारा देश जागा झाला. मोर्चे निघाले, आंदोलनं झाली आणि मानसिकता बदलण्याबद्दल भाषणं दिली. त्या सहा लोकांच्या फाशीची मागणी लावून धरली, आणि खवळून उठले.
ती मुलगी गेली त्यानंतर दोन महिने उलटले आणि तरीही मुलींचे बळी जातच राहिले. समिधा पडतच राहिल्या. मग कुठं आहे मानसिकतेतला बदल?

पूर्ण भारतासारखंच मीही या विषयावर जागरूक राहिले. त्यावरल्या क्रिया-प्रतिक्रिया वाचल्या. “महिलांवरील हिंसा थांबवा” असा मथळा असलेलं एक पत्रक माझ्या हाती आलं म्हणून उत्सुकतेपोटी या संकल्पनेची व्याख्या शोधली. तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने दिलेली व्याख्या ऐका. “महिलांविरोधात हिंसा म्हणजेच असे कोणतेही कृत्य ज्याचा परिणाम महिलेला शारिरिक, लैंगिक किंवा मानसिक हानी किंवा त्रासात होईल किंवा होऊ शकेल. यात सार्वजनिक किंवा वैयक्तिक जागी घडलेल्या अशा कुठल्याही गोष्टीचा धोका असण्याचाही अंतर्भाव असेल” एवढी विस्तृत व्याख्या कळल्यावर मनाला हे पटेचना की इतक्या साऱ्या गोष्टींविरोधातली मानसिकता समूळ बदलणं शक्य आहे.

माणसाच्या वागण्या-बोलण्याचे दोन मूलभूत प्रेरणास्त्रोत असतात. एक संस्कार आणि दुसरा भिती.

मी सुरुवातीलाच म्हणाले तसं भारताच्या आद्यपुरुषानेच “स्त्री स्वातंत्र्य न मर्हति” चा संस्कार दिला आहे. पिढ्या न पिढ्या मुलगा मुलगी वेगळे हाच संस्कार झाला आहे नि होत आहे. मग आज एका रात्रीत हे सारं बदलेल, मानसिकतेत अमूलाग्र बदल होतील असं मानणं खरंच वास्तविक आहे का?

मग उरला भाग भितीचा. “बाबा रागावतील हं” अशी भिती लहानपणापासून आई आपल्याला घालतेच आहे ना मग कायदा काय वेगळा असतो? जिथे जिथे सज्जनांची मवाळ भाषा चालत नाही तेथे हा बडगा उगारावाच लागतो. कारण कसं आहे, माणूस हा एकच प्राणी असा आहे ज्याला माणूस बनणं शिकवावं लागतं

खरं सांगायचं तर काही प्रमाणात तो तसा उगारलेला आहेसुद्धा. स्त्री भ्रूण हत्येपासून ते हुंडाबळी पर्यंत स्त्रीवर होणाऱ्या प्रत्येक अत्याचाराविरोधात कायदा आहे. पण तो किती परिणामकारक आहे? आपल्याला गुन्हेगारांना बडगा दाखवायचाय! फुलबाजी नव्हे.

भारतीय दंड विधान कलम ३७६ अंतर्गत सामुहिक बलात्काराची शिक्षा १० वर्ष. अपहरणासाठी कलम ३६३ ते ३७३. हुंडबळीसाठी ३०२ अंतर्गत जास्तीत जास्त जन्मठेप. लैंगिक अत्याचाराविरोधात कलम ५०९ असे अनेक कायदे आज आहेत पण त्यांची भिती मात्र उरलेली दिसत नाही.

कायदा न्यायव्यवस्थेचा पाया असतो. कायदा दोन प्रकारचा असू शकतो एक प्रतिबंधात्मक किंवा दंडात्मक. आणि आपल्याकडे दोन्ही प्रकारचे कायदे असूनही ते कमकुवत आहेत आणि अंमलबजावणी बाबतीत तर साराच ठण ठण गोपाळ!

संस्कारांनी दिलेली मानसिकता तेव्हाच बदलेल जेव्हा ती बदलली नाही तर कायदा मोडल्याबद्दल शिक्षा होतील. कायद्याचे हात बांधलेले असतात. जोवर स्त्री स्वतः पुढे येऊन तक्रार दाखल करत नाही तोवर कायदा निष्प्रभ असतो. आणि ती तक्रार दाखल करण्याएवढं धैर्य स्त्रीत तेव्हाच येईल जेव्हा त्या कायद्यावर तिचा स्वतःचा विश्वास असेल त्याच्या सक्षमतेची तिला खात्री असेल. जोवर कायद्यात बदल होत नाही तोवर मानसिकतेतले बदल होऊन काही उपयोगही नाही. तुमची मानसिकता बदलल्याने अत्याचाऱ्याला शिक्षा होत नाही. ती कायदा बदलल्यानेच होते

बरं अगदी आजच्याही परिस्थितीत एक महिला धीर करून कायद्याच्या दारात दाद मागण्यासाठी जाते तेव्हा या केसेस वर्षानुवर्ष तारीख पे तारीख न्यायानं चालत राहतात. न्यायमूर्ती स्वतःच कीत्येकदा भ्रष्ट असतात असेही बोलले जाते. आधीच अत्याचारानं अर्धमेला झालेला तो जीव विचित्र प्रश्न सार्वजनिकरित्या मुद्दाम विचारून पूर्ण मारला जातो. अत्याचार करणाऱ्याला सहज जाऊ देणाराही अत्याचारीच ठरतो. त्यामुळे न्यायव्यवस्थेच्या भ्रष्ट प्रवृत्तीला आळा घालणंही राईट टू रिकॉल किंवा ज्युरी सिस्टीम सारख्या सक्षम कायद्यांच्याच हाती आहे. तिथेही मानसिकता बदलाचा प्रश्न येत नाही.

मूलतः कुठलाही कायदा आणि त्यान्वये होणारी शिक्षा हे प्रातिनिधिक असतात. एकाला कडक शिक्षा झाली की मागचे शंभर जण पुढच्यास ठेच मागचा शहाणा न्यायाने सुधरतात. बदलत्या काळानुसार प्रातिनिधित्वाची संकल्पनाही बदलते आणि त्यासोबत कायद्यात बदलही अनिवार्य असतात.
प्रश्न एवढा ज्वलंत आहे की त्यावर समुपदेशन नव्हे तर क्रांती व्हायला हवी. आणि ही क्रांती सशक्त कायदेच आणू शकतात कारण समाजाची मानसिकता ठरवण्यात देखिल कायदयाची प्रमुख भूमिका असते.
समाजाचा दुर्बल घटक संरक्षित ठेवणं ही पूर्ण समाजाची जबाबदारी असते आणि कायदा हा समाजव्यवस्थेच्या दिग्दर्शकाचं काम करतो. जेवढा कायदा सक्षम तेवढाच समाज सुदृढ बनत जातो.
स्त्रीच्या बाबतीत बोलायाचं झालं तर गर्भावस्थेपासून वृद्धावस्थेपर्यंत प्रत्येक स्त्रीला हे दिग्दर्शन सक्षमरित्या मिळालं तरच ती स्वतः सक्षम बनू शकेल.

तुझ्या अंतरंगी व्यथा चंदनाची
तुझ्या वेदनेला प्रथा सोसण्याची
कधी तू धरेची कधी तू नभाची
कधी अंगणाची कधी तू घराची.

ओळी सुंदरच आहेत. मात्र स्त्रीचं हे सहनशील आणि सर्वव्याप्त असणं ही तिची अगतिकता नसून सक्षम कायद्यांच्या साह्यानं घेतलेला सक्षम निर्णय जेव्हा असेल तो खरा सुदिन.

संहिता हिस्वनकर
samhita.hiswankar@gmail.com

# पूजाच्या फेसबुक अकाऊंट मधे शिरलेला आत्मा

कॉलेज ला सुटी असल्याने पूजा निवांत होती..सकाळी कॉफी चा मग घेऊन ती कम्प्युटर च्या टेबलावर आली अन डेस्क टॉप चालू केला.. फेस बुकच्या अकौंटवर गेली अन पोस्ट वाचू लागली .. डाव्या कोपऱ्यात नजर गेली अन कुणाची तरी मैत्री विनंती आलेली तिला दिसली.. तिने क्लीकले व फोटोवर क्लीकून त्या अकाऊंट वर गेली...

राहुल पानसे नी ती मैत्री साठी विनंती केली होती..... सॉफ्टवेअर इंजिनिअर.. राहणार पुणे.. सध्या फरीदाबाद... पूजा वाचत होती.. तिने त्याचे मित्र चेक केले बरेचसे मित्र पुण्यातलेच होते एकूण १५-२० मित्रांची यादी होती. पूजा विचारात पडली की याने ओळख नसताना का मैत्री याचना केली असेल? फोटो तर खरा वाटत होता. फेस बुकावरचे सध्याचे वातावरण, कुणीच सामाईक मित्र नाही .त्या मुळे तिने ती रिक्वेस्ट डीलिट केली..

जसे तिने डीलीट वर क्लीकले, अन एकदम मोझिला वेब पत्र थरथरू लागले.. निमिषार्धात तो वेग वाढला अन एक विचित्र आवाज आला अन संगणक हँग झाला. "आले वाटते याच्या अंगात" वैतागून पूजाने संगणक बंद केला व पुन्हा रीबुट केला. विंडो चा लोगो आला अन परत कॉम्प बंद. शेवटी थोडी खटपट केली पण संगणक हटून बसला होता अन वैतागून पूजाने सर्व्हिस इंजिनिअरला फोन केला. थोड्या वेळातच तो आला व कॉम्प चेक केला अन म्हणाला "बहुतेक व्हायरस शिरला आहे. फ़ॉर्मॅट करून परत विंडो लोड करून देतो हो म्हणण्या शिवाय तिला पर्याय नव्हता...त्यांने परत विंडो लोड केली इंटर नेट कनेक्शन लावले व कॉम्प सुरू झाला..

कश्या मुळे झाले असेल असे? पुजाने विचारले .."होते काही वेळा एखादी अनोळखी लिंक क्लीकली का?.. पूजाने राहुल च्या अकाऊण्ट ची लिंक क्लीकली असे म्हणताच तो हसला व .त्या वर म्हणाला मला नाही वाटत हे कारण असावे....



वेट. म्हणत तिने फेस बुकाचे पान उघडले व तिच्या अकाउंट वर गेली अन चकीत झाली.. परत मैत्रीची रिक्वेस्ट आली होती.. तिने पाहिले ती राहुलचीच होती.. तिने इंजिनिअरला सांगितले की तू आता ही विनंती नकार कारण मी नाकारल्या वर कॉम्प हॅंग झाला होता. "असं काही नसतं" असे म्हणत जसे त्याने डीलीट लिंक वर क्लीकले, अन तसे एकदम मोझिला वेब पत्र थरथरु लागले. निमिषार्धात तो वेग वाढला अन एक विचित्र आवाज आला अन संगणक हॅंग झाला. हे पाहिल्यावर इंजिनिअर पण हादरला व म्हणाला "हा पोरगा भारी दिसत आहे त्याने व्हायरस लिंकला जोडला असावा मी आमच्या सराशी बोलतो" पण सरांचा फोन लागेना. त्याने परत फॉर्मॅट करून विंडो लोड करून दिली. तेव्हढ्यात सरांचा फोन आला त्यांनी सारे ऐकले व उद्या येतो असे सांगत पूजाला ती लिंक न क्लीकता कॉम्प चालव असे सांगितले..

खर तर पूजा खूप चिडली होती व तिने ह्या राहुल ची तक्रार सायबर पोलिसात द्यायची असे ठरवले. पण ती परत त्या अकाउंट वर गेली. व नेमका काय प्रकार आहे तो पाहण्यासाठी त्याच्या लिस्ट मधल्या पुण्याच्या अभिजित दातार ला मैत्री विनंती पाठवली व आपला फोन नंबर दिला व फोन कर असा मेसेज दिला. पूजांची मैत्री विनंती आलेली पाहिल्यावर अभिला पण कळत नाही. पण फोन नंबर असल्याने तो उत्सुकते पोटी फोन लावतो.. "हाय" पुजाचा आवाज येतो व सायंकाळी ७ च्या सुमारास डेक्कन वरच्या सी.सी.डी वर भेटण्याचे ठरते. का? असे अभिजित विचारत असतो पण भेटल्यावर बोलु असे पुजा म्हणते...

अभिजित भेटल्यावर प्राथमिक स्वरूपाचे बोलणे होते व पुजा सरळ विषयाला हात घालते व विचारते.. "तुझा मित्र राहुल पानसे कसा मुलगा आहे??" तिच्या प्रश्नाने अभिजित गडबडतो व विचारतो का? काय झाले नेमके? त्यावर पुजा त्याला झालेला प्रकार सांगते. ते ऐकून मात्र अभिजित चकीत होतो व तिला सांगतो की असे होणे शक्य नाही.. का शक्य नाही? पुजा ने त्याला विचारले. “मुले मैत्री साठी काहीही करू शकतात.” “ते बरोबर आहे पण राहुल असे करू शकत नाही कारण तो आता या जगात नाही.. त्याला जाऊन आता ६ महिने होतील..” अभि म्हणाला..

“काय???” आता चकीत होण्याची वेळ पुजाची होती.व चर्चेतून तिला कळले ते असे होते. राहुल अभिजित चा बाल मित्र,इंजिनिअर झाल्यावर त्याला दिल्लीतल्या एका कंपनीत नोकरी लागली.. पगार पण चांगला होता. पण तो फरिदाबादला रहात होता अन मोटार सायकलवरुन ऑफिस मध्ये ये जा करीत असे. एकदा कामावरून तो उशिरा सुटला अन वाटेतच त्याला एका ट्रक ने उडवले. ट्रक चा धक्का इतका जोरदार होता की राहुल बाजुच्या खड्ड्यात जबर दुखापत होऊन मोटार बाइक समवेत पडला व तात्काळ गतप्राण झाला..

३-४ दिवस राहुल ऑफिस मध्ये आला नाही म्हणून चौकशी सुरू झाली. घरमालकाने पण तो घरी आला नसल्याचे सांगितले. पुण्याला घरी फोनाफोनी झाली अन पुण्याला पण तो आला नसल्याचे कळल्याने शेवटी ऑफिस च्या लोकांनी पोलिसात तक्रार केली शेवटी शोधाशोध केल्यावर राहुलची बॉडी मिळाली. पोलिसानी व कंपनीच्या लोकांनी पुण्यास ही बातमी कळवली. राहुलला बाबा नव्हते. एकुलता एक मुलगा आईने वाढवला होता साथ भावाची चंदुमामाची. आईवर तर आकाश कोसळले. चंदुमामा दिल्लीस आला. बॉडी ची दशा झाली होती. पोलिसांच्या सल्ल्याने दिल्लीलाच दहन करण्यात आले. त्याच समयी चंदुमामास फोन आला की आईस हॉस्पिटल मध्ये भरती केले आहे. त्या साठी चंदुमामा उलट पावली पुण्यास आला.

अभिजित ने हे सारे पुजास सांगितले. "मला चंदुमामाचा पत्ता मिळेल का?" पुजाने विचारले. "हो मिळेल ना. आई व मामा एकाच सोसायटीत शेजारी शेजारीच राहतात" अभि म्हणाला व तिला पत्ता व फोन नंबर दिला. दुसऱ्या दिवशी पुजा चंदुमामास भेटायला गेली व तिने तिच्या बाबत घडलेला प्रसंग मामास सांगितला. तो ऐकून चंदुमामा चाट झाला. यावर पुजाने त्यांना मी यावर उपाय शोधते. पण तुमचे सहकार्य हवे अशी विनंती केली. नक्की मिळेल" असे मामाने सांगितल्यावर पुजाने निःश्वास सोडला..

हा सारा प्रकार अमानवी आहे हे पुजाने ओळखले होते व त्यावर उपाय प.पु त्रिनेत्र कर्मण्यित [ॲक्टिवेटेड] ढ्गे महाराज हेच सांगु शकणार. प.पु त्रिनेत्र कर्मण्यित [ॲक्टिवेटेड] ढ्गे महाराज हे स्वामी म्हणजे कलियुगातील चमत्कारच. पुजाला त्यांनी अनुग्रहित केलेले होते. कारण तिची मागच्या जन्माची पुण्याई. असे मोजकेच बाबांचे शिष्य होते. पुजा आश्रमात गेल्यावर बाबांची भेट झाली .

बोल बेटा. आज आमची आठवण आली. बाबा हसत म्हणाले. यावर पुजाने सारा किस्सा सांगितला. क्षणार्धात बाबा ध्यानात गेले डोळे उघडले व बाबा म्हणाले. राहुल चे पिंडदान केले गेले होते का? पुजा गडबडली व तिने चंदुमामास फोन लावला. 'नाही केले बाबा ". पुजा म्हणाली बाबा हसले. "बालिके.राहुल च्या आत्म्यास मुक्ती मिळाली नाही त्याचा सूक्ष्म देह अवकाशात मुक्तीसाठी घिरट्या घालत आहे व त्याने तुझ्या अकाउंटला हॅक केले आहे." हे ऐकल्यावर पुजा हादरली. ते पाहून बाबा म्हणाले "घाबरू नकोस तू सर्वपितरे पिंडे गुरुजीस जाऊन भेट व पिंडदान विधी संपन्न कर.. माझे नाव त्यांना सांग"

हे ऐकल्यावर पुजाच्या जिवात जीव आला. पुजाने हे सारे चंदुमामा बरोबर चर्चिले व मामा पण तयार झाले. पुजाने सर्वपितरे पिंडे गुरुजीची गाठ घेतली व दिवस नक्की केला. विधीसाठी पुजा मामा व राहुल चे काही बाल मित्र उपस्थित होते. सर्व क्रिया झाल्यावर गुरुजीने पिंड कट्ट्यावर ठेवले व सारे जण काकस्पर्श पिंडास कधी होतो याची वाट पाहत होते पण पिंडास कावळा शिवेना. "बहुतेक आत्म्याच्या काही इच्छा राहिल्या असाव्यात वा त्याला काळजी वाटत असावी आईची" गुरुजी म्हणाले. तुम्ही आत्म्यास आवाहन करा. मामा हात जोडत आकाशाकडे पहात म्हणाले "राहुल तू आईची काळजी करु नकोस मी तिचा सांभाळ करेन. पण कावळा पिंडास शिवेना... मित्रानी पण काही मैत्रीत चुका झाल्या असल्यास माफ कर असे आत्म्यास आवाहन केले पण कावळा पिंडास शिवेना.

शेवटी पुजाने हात जोडले व म्हणाली. "राहुल तुझी मैत्री स्वीकारली नाही या बद्दल मला माफ कर. तुझा आत्मा मुक्त झाल्यावर तू पुन्हा जन्म घेशील व कोणत्याही रूपात येशील तेव्हा मी तुझ्या मैत्रीचा नक्कीच स्वीकार करीन. आपण चांगले मित्र होऊ. असे मी तुला वचन देते. मात्र तू तुझा डी.पी बदलू नकोस“ असे म्हणाल्यावर चमत्कार झाला काठावरचा कावळयांचा थवा आला अन पिंडास शिवला..”  राहुलचा आत्मा मुक्त झाला होता. घरी आल्यावर पुजाने अंघोळ केली अन फेस बुकावरच्या अकाउंटवर गेली.. राहुलची मैत्रीची रीक्वेस्ट दिसत नव्हती. .राहुलचा आत्मा मुक्त झाला होता  आता तिचा कंप्युटर छान चालतो..

अविनाश कुलकर्णी
avinash.g.kulkarni@facebook.com

# प्रेमाची धमाल गोष्ट

मी विकास. विकास देशपांडे. ठाण्याचा अस्सल मराठी मुलगा. मराठीचा नुसता अभिमानच नाही तर जाज्वल अभिमान असणारा. कारण माझं गावच पुणे आणि पुणे तिथे काय उणे, म्हणतात "पुण्यात खूप हिरवळ आहे मग प्रेमात पडायला मी दुसरीकडे जाऊच कशाला? आणि ज्यांना आपल्या जातीत कमीपणा वाटतो ते दुसरीकडे नजरा मारतात आणि जातीचं सौंदर्य पाहायला मर्दाची नजर हवी" हे माझं मत आहे. आमच घराणं घरंदाज आहे. लोक माझ्या आई वडिलांना खूप मान देतात त्यामुळे मी बोट दाखवावं आणि आमच्या जातीतील कोणतीही मुलगी माझ्या आईची सून बनून घरात यावी, एकूण अशी परिस्थिती. त्यामुळे जातीबाहेर लग्न नाही करणार एवढं मनाशी पक्क होतं, घरातले तर मागे होतेच की लग्न कर पण, माझी परी मला अजून भेटली नव्हती जी माझ्यावर प्रेम करेल आणि जिच्या आवडी-निवडी माझ्या सारख्याच असतील. आजूबाजूला खूप पोरी असतात पण दिलाची चोरी एखादीच करते. स्वभावाने रागीट असणारा, सहसा कोण्या मुलीला भिक न घालणारा मी, पडलो... कुठे?? अहो प्रेमात........!!

माझ्या ऑफिस मध्ये एक नवीन मुलगी नव्याने कामाला आली. सीमा, "सीमा शेते". खल्लास दिसायला छान, गोड, एकदम टापटीप राहणारी, कामात चोख आणि बोलण्यातही. एकदम मराठी साज असणारी सीमा. तिला जेव्हा पहिल्यांदा पाहिलं नं तेव्हाच काहीतरी झालं. आमच्या ऑफिस मध्ये कोणी नवीन मुलगी आली की आमच्या मुलांची लंच टायमिंगला त्या नवीन मुलीसाठी मिटिंग होयाची, त्यात मग ती कोण? कुठे राहते? आणि विशेष म्हणजे तिचा बॉय फ्रेंड आहे की नाही यावर चर्चा रंगायची .

सीमा मूळची रायगडची, फक्त कामासाठी ठाण्याला येते. लांब पडतं म्हणून इथेच गर्ल्स होस्टेल मध्ये राहते, आणि फक्त रविवारी घरी जाते आणि विशेष म्हणजे तिचा कोणीही बॉय फ्रेंड नव्हता, मुलगी खूप साधी आहे. गरीब गायच. असं प्रमाण पत्र आमच्या समितीने दिलं. आणि मी तेव्हाच ठरवलं ही गरीब गाय आपल्याच गोठ्यात आणायची .

सीमाशी ओळख झाली, ती मला म्हणाली की तू माझ्या एका मित्रा सारखा दिसतोस, कोण हा मित्र? असेल कोणी तरी, मला मित्र बनवलं नं आता ती तिचे सर्व मित्र विसरेल, हा आत्मविश्वास धरून मी सीमाशी वेळ मिळेल तेव्हा बोलायचा प्रयत्न करायचो थोडक्यात मी किती शहाणा आहे हे तिला पटवून द्यायचो. मी वेगळा होतोच, पण या पोरीमुळे मी आता आगळा वेगळा झालो होतो. ते दिवस खूप वेगळे होते . कामात कमी माझं तिच्या कडेच लक्ष जास्त असायचं. तिला चोरून बघणं, तिच्याशी तासान तास गप्पा मारणं, फक्त तिचाच विचार, कधी कधी तिला तिच्या हॉस्टेल पर्यंत सोडायला गेलो की ती जाताना पाहून भरून यायचं, वाटायचं की असंच रहावं गप्पा मारत. कारण की सोबत असली की कशाचीच गरज लागायची नाही, भूक पण विसरायचो. तिला वाचनाची आवड होती म्हणून मी तिला एक मोठं पुस्तक "The Histroy & Geography of world " दिलं होतं हेतू हाच की तिने तिचा काही इतिहास असेल तो विसरावा आणि नवीन भूगोल घडवावा. असं वाटत होतं की आता ही मैत्री नाही तर त्याच्याही पुढे काही तरी आहे, विचारणं गरजेचं आहे आणि एकदा आम्ही बाहेर भेटलो , फक्त ती आणि मी. आज मला पहिल्यांदा तिच्या सोबत भीती वाटत होती कारण जर नकार आला तर ती मैत्री पण ठेवणार नाही याची खात्री होती. म्हणून मी खूप सावधगिरिनी वागत होतो, तिच्या सोबत मी खूप गप्पा मारल्या पण तिच्या आवडी निवडी माझ्याशी जुळतात का हे कधी विचारलंच नाही, आज संधी होती.. आणि आमच्या आवडी निवडी जुळतील याची खात्री होती .

मी : तुझा आवडता Actor कोणता ?
ती : माधवन आणि अल्लू अर्जुन
मी : (ओरडून ) काय ?
ती : तुझा ?
मी : अशोक सराफ
मी : तुझ्या घरी कोण कोण असतं गं ?
ती : अम्मा , अप्पा , मी आणि दादा
मी : तू आई बाबांना अम्मा , अप्पा बोलतेस ?
ती : हो लहान पणा पासूनच
मी : वा छान !!
मी मनातल्या मनात बोललो " आई , बाबा बोलायची लाज वाटते तर हे परप्रांतीय शब्द वापरतेय , आणि सासू बाईना पण कस चालत ?“
मी : तुला जेवणात काय आवडतं गं?
मला खात्री होती ती नक्कीच वरण भात बोलणार, कारण ती होतीच वरणासारखी गोड, पण....
ती : इडली , डोसा आणि उत्तपा
मी : (ओरडून) काय? इडली
ती : आणि तुला ?
मी : झुणका भाकर आणि पुरण पोळी .
तिची ही उत्तरं ऐकून आमच्या आवडी निवडी किती जुळतात हे कळत होत पण तरीही मी आशा सोडली नव्हती
मी : तुला Arrange Marriage आवडेलकीLove Marriage ?
ती : अर्थात Love Marriage ?
आता कुठे तरी बर वाटल , चल एक गुण तरी जुळला .
ती : इच्छा तर खूप आहेकी Love Marriage करावं पण या गोष्टी आपल्या हातात थोडी असतात . त्या तिरुपती बालाजीच्या मनात असतं तसंच होतं

आयला, देव पण दाक्षिणात्य,वर स्वर्गात लग्न कार्यालयात एकही मराठी देव कामाला नाही की काय? ही त्या बालाजीचं नाव घेतेय. आता मात्र मी चिडलो.
मी : काय गं तू? मघापासून मी बघतोय की तू सर्व गोष्टी South Indian बोलतेयस, मराठी असल्याची लाज वाटते का तुला ?
ती : मी मराठी गोष्टी कश्या बोलणार ? कारण मी मराठी आहेच कुठे ?
मी : काय ? तू "सीमा शेते" आहेस नं रायगडची ?
ती : नाही, मी शेते नाही तर शेट्टृ आहे मंगलोर कर्नाटकची , तुझा पण घोळ झाला न , काय आहे मी राहते रायगडला , माझं शिक्षण पण मराठी माध्यमात झालंय, मी चांगलं मराठी बोलते म्हणून मी south Indian आहे हे कुणाला सांगूनही पटत नाही, मी सांगते सीमा शेट्टृ आणि ते ऐकतात शेते. मी जेव्हा या ऑफिस ला आले तेव्हा आपले बॉस बोलले की तू मराठी दिसतेस म्हणून तू आमच्यासाठी शेते. मीही म्हणाली चालेल आणि हा माझा इतिहास सांगत बसण्या पेक्षा आडनाव बदललेलं चांगलं नाही का?
नाही तरी कोणी तरी म्हणालंच आहे नावात काय आहे, तसं मीही म्हणते आडनावात काय आहे? म्हणून मी मराठी मातीत वाढली असली तरी रक्त कर्नाटकी आहे. हीचं हे सर्व ऐकून माझ्या आता कर्णा तून रक्त यायचं बाकी होतं. माझा मूड गेला आणि मी पुन्हा एकदा माझ्या निर्णयावर विचार करायचं ठरवलं. पण नाही ती कोणीही असली तरी ती मला आवडत होती, नव्हत्या जुळत आवडी निवडी, नव्हते स्वभाव सारखे, आणि महत्वाचं ती माझ्या पेक्षा दोन वर्षांनी मोठी होती, सर्व गोष्टी विरूद्धच होत्या तरीही तिची साथ हवी हवीशी वाटायची. मला माहित आहे सीमाशी लग्न म्हणजे तिला आणि मला घराची सीमा सोडावी लागेल कदाचित कायमची. पण तरीही नाही मी सोडू शकत तिला. मी अजूनही तिला किंवा तिने मला प्रपोज नाही केलं कारण त्याची कधी गरजच वाटली नाही. आणि सांगावं लागतं किवा मागावं लागतं ते प्रेम कसलं? सीमा ने जॉब सोडला ती आता दुसरीकडे कामाला आहे, ती लांब आहे फक्त फोनवर बोलणं होतं , बोलणं कसलं? भांडणच होतं पण तेही गोड असतं, ती म्हणते कधीकधी की तू माझ्यावर संशय घेतोस, पण तो संशय समजून घे सीमा त्यात फक्त प्रेम असत प्रेम जे म्हणतं की तू फक्त माझीच आहेस. दुसरी कोणाचीच नाहीस. आमचं लग्न होईल की नाही ते सीमाच्या बालाजीलाच माहीत पण आमचं प्रेम असंच कायम राहील .

मच्छिंद्र म्हात्रे
machindra14@gmail.com

# झाडांना धडा

फार फार वर्षांपूर्वी झाडे काही आत्ता आहेत तशी नव्हती, वेगळीच होती. झाडांना डोळे होते, हात पायही होते. आणि सर्वात विशेष म्हणजे झाडे एका जागेहून दुसऱ्या जागी चालत अथवा पळत जात असत. फांद्या मात्र अशाच होत्या पसरलेल्या, विस्तीर्ण. पृथ्वी मातेची खास आवडती असल्याने त्यांना खूपच मान दिला जात असे. त्यांची घरोघरी पूजा होत असे. जिथे जातील तिथे त्यांना पाणी दिले जात असे. झाडेही आपल्या हाताने आपली फुले, फळे तोडून लोकांना, लहान मुलांना देत असत. झाडांवर कोणीही दगड मारत नसत. अगदी सगळे खूप छान होते॰

पण एकदा काय झाले, काही लहान मुले खेळत असताना, एक मुलगा पडला व बाकी मुले त्याला हसली. तो उठून परत खेळू लागला. हे एका खोडकर झाडाने पाहिले व बाकी सर्व झाडांना सांगीतले. त्या खोडकर झाडाने देखील रस्त्याने चालताना एका मुलाला पाडले व बाकीची झाडे त्या मुलाला हसली. तो मुलगा उठून घरी निघून गेला. पण झाडांना मात्र भारी गम्मत वाटली. आता सर्व झाडांनी असेच करायचे ठरवले. रस्त्यात मुले दिसली रे दिसली की त्यांना पाडायचे. हळू हळू ती मोठ्या माणसांचीही थट्टा करू लागली. मोठ्यांना पण पाडू लागली. रस्त्याने चालता चालता हात आणि फांद्या पसरवून चालायची, जेणे करून रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना लागून ती पडली पाहिजे. कोणीही उन्हात थकून सावलीत विश्रांतीला थांबले की पळून जायचे, म्हणजे सावलीत बसलेला मनुष्य परत उन्हात येत असे, व झाडे त्याला हसत असत. कोणत्याही मावशीने, काकीने अंगण झाडले, सडा, रांगोळी केली की मुद्दाम तिथे जाऊन परत आपली सर्व वाळलेली पाने पाडत असत. इतकेच काय तर पक्षांनि बांधलेली घरटी सुध्धा ते लपवून ठेवत असत. मग बिचारी पक्षिण आपल्या लहान पिल्लांना शोधून कासावीस होऊन रडत असे, व ती रडायला लागली की झाडे हसत असत. नंतर नंतर तर झाडांनी हद्द्च सोडली. सर्व जन एकदम जात व नदीत आडवी पडत मग नदीचा प्रवाह अडून सगळीकडे पूर येत असे. सर्वच लोक खूप त्रासले होते. काही लोकांनी झाडाच्या फांद्या तोडण्याचा प्रयत्न केलाही, पण सर्व झाडांनी मिळून त्या लोकांना इतके मारले की परत झाडांच्या जवळ जायची कोणाची हिम्मत होईना. पण झाडांना मात्र गर्व झाला होता की त्यांच्यामुळेच आज समस्त मानव जात, पशू, पक्षी श्वास घेत आहेत, पाऊस पडत आहे आणि भरीत भर म्हणून आता दहशत ही पसरवून ठेवली होती.

लोकांनी देवाचा धावा सुरू केला. प्रार्थना करायला कालू केली. "देवा आमची ही काय गती?, आमचे प्राण तुझ्याच हाती" अशी भजने गायला चालू केली. पण काही उपयोग झाला नाही.

एकदा इंद्रदेव सहजच फिरायला म्हणून पृथ्वीवर आले होते. हिमालयावर फिरून आले. कैलास पर्वत बघून आले. काश्मीरचे नंदनवन पाहीले. त्यांच्या डोळयाचे जणू पारणेच फिटले. एक दिवस रस्त्यावरून जाताना त्यांना एका झाडाला मधुर असे आंबे लटकलेले दिसले. आंब्यांचा वासही एकदम गोड येत होता. त्यामुळे त्यांना ते आंबे खावेसे वाटले. ते आंबा तोडायला म्हणून गेले, तर झाडाने आपली फांदीच वर घेतली. हाताला येत नाहीत असे समजून ते शेवटी झाडावर चढले, तर झाडाने फांदी हलवून हलवून त्यांना खाली पाडले. वाऱ्याने पडलो असेन असे समजून ते परत झाडावर चढणार ,तितक्यात तेथे एक माणूस आला, व तो म्हणाला " हे देवराज, कृपया या झाडांपासून सावध रहा , खूपच भयंकर आहेत ही सर्व. आपणास मुद्दामच त्रास देतील" . यावर देवराज म्हणाले "काहीतरी उगाच सांगू नकोस बाबा, आजपर्यंत कधीही झाडाने मानवाला त्रास दिलेला नाही. इतके मधुर आंबे ज्या झाडाला येतात, ते झाड कधीही कोणाला त्रास देऊच शकत नाही. तू आपला तुझा रस्ता शोधलास तर बरेच होइल." हे भाषण ऐकून तो माणूस तेथून निघून गेला. इंद्रदेवांनी नंतर दोन तीन वेळा झाडावरून आंबा तोडण्याचे असफल प्रयत्न केले, पण प्रत्येक वेळेस झाडाने त्यांना पाडले. परंतु त्यांना वाटे की वाऱ्यानेच आपण पडत असू. म्हणून ते शेवटी उठून चालू लागले. त थोडेच अंतर चालून गेले असतील तोच मागून ते आंब्याचे झाड पळत आले व देवराजांना पाडले. आणि बाकीची सर्व झाडे जोरात हसू लागली. मग मात्र देवराजांना खूप राग आला. सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला. तो माणूस सांगत होता ते सत्य आहे असे त्यांना जाणवू लागले. त्यांनी चिडून सर्व झाडांना शाप दिला की ज्या पायांवर तुम्ही इकडे पळता, ते पाय आहे त्या जागी जमिनीत रुततील, नवीन झाडांना पायच नसतील आणि ती मुळात जमिनीतच उगवतील. दुसऱ्यांना ज्या तोंडाने तुम्ही हसता ते तुमचे तोंड कायमचे बंद होईल. आणि ज्या डोळयांनी तुम्ही दुसऱ्यांना त्रास झाल्याचा मनमुराद आनंद लुटता ते डोळेही इथून पुढे तुम्हाला नसतील. तुम्ही केलेल्या पापाचे फळ म्हणजे येणाऱ्या काळात मानव तुमची मोठ्या प्रमाणावर तोड करेल आणि त्याला हवा तसा तुमचा वापर करेल आणि तुम्ही काहीही करू शकणार नाही. मग हळू हळू तुमचा नाश होईल."

हे ऐकून झाडांना तर धडकीच भरली व ते सर्व देवराजांची माफी मागू लागले. एक प्रौढ झाड म्हणाले “हे देवराज आम्ही हे मान्य करतो की आमच्या हातून नकळतपणे खूप चुका झाल्यात. आम्ही नक्कीच शिक्षेस पात्र आहोत. तुम्ही द्याल ती शिक्षा आम्हाला मंजूर आहे आणि आम्ही आपल्या आज्ञेबाहेर नाही. परंतु देवराज याचाही विचार करावा की मानव जात, पशू, पक्षी पृथ्वीवर प्राणवायू शिवाय जगू शकत नाहीत. आणि हा प्राणवायू मोठ्या प्रमाणावर आम्ही उपलब्ध करून देतो. हे परमपूज्य देवराज अखील जीवसृष्टीचा विचार करूनच मी बोलत आहे. आम्हाला शिक्षा देण्याच्या रागात आपण संपूर्ण जीवसृष्टीचा विचार करत नाही आहात. माझ्या म्हणण्याचा थोडासा विचार करावा व आणि मगच निर्णय घ्यावा”. इंद्रदेवलाही झाडाचे म्हणणे पटले पण त्यांचा राग अजिबात शांत झालेला नव्हता, त्यामुळे ते म्हणाले“ तुमचे म्हणणे मला पटले आहे, परंतु मी माझा शाप परत नाही घेणार कारण तुम्ही माझ्या लाडक्या मानवास खूपच त्रास दिलेला आहे, त्याची शिक्षा तुम्ही भोगलीच पाहिजे, आणि जेव्हा मानवास हे पटू लागेल की तुम्ही त्याच्यासाठी खूप उपयुक्त आहात, परोपकार कसे असावेत हे तुमच्याकडे बघूनच कळेल, त्यावेळेला तुम्हास संपविणे मानव थांबवेल आणि तुमची जास्तीत जास्त लागवड करेल, मगच तुमची संख्या वाढेल आणि पृथ्वीचे कल्याण करण्याचे पुण्य तुम्हास प्राप्त होईल. ध्यानात ठेवा झाडांनो तुम्हीच या पृथ्वीला विनाशापासून वाचवू शकता आणि तुम्हीच वाचवणार आहात”

मग सर्व झाडांनी देवराजांची क्षमा मागितली, त्यांचे चरणस्पर्श केले व “पृथ्वीचे सदा कल्याण करीत रहा” असा त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला. देवराज इंद्र तेथून निघून जाताच सर्व झाडे जागीच स्तब्ध झाली, पुढचे काही दिसेना, बोलताही येइना. आणि तेव्हापासून ती सर्व अशी ऋषि मुंनिंसारखी शांतपणे मानवकल्याणाची साधना करीत उभी आहेत, ती आजतागायत करीत आहेत. तर बालमित्रांनो, चलातर , आपणही झाडे लावूया आणि पृथ्वीचे कल्याण करण्यात झाडांना हातभार लावूया. मग लावणार ना दर वाढदिवसाला एक झाड?

सौ शामला अभिजीत क्षीरसागर ,
shamala.shindagi@bilt.com

# टूर द पंजाब

अमृतसर बघण्याची सुरुवात सुवर्णमंदिरापासून करायची ठरली आणि रिक्षा पकडून आम्ही दोघे सुवर्णमंदिराकडे निघालो. मंदिराच्या आधीच वाटेत जालियानवाला बाग दिसली आणि पावले तिकडेच वळली. “जालियानवाला बाग” लहानपणापासून अनेकदा ऐकलेली, वाचलेली, स्वतः वक्तृत्व स्पर्धेत मांडलेली. अंगावर सर्रकन काटा आणणारी जालियानवाला बाग. आत शिरताना मनात विचारांचा कल्लोळ उठला होता. बागेत शिरायचा रस्ता अत्यंत चिंचोळा. तोच रस्ता - जिथून जनरल डायर सैनिक घेऊन आत शिरला. बागेत यायला आणि जायला एकच रस्ता. तेव्हाही आणि आत्ताही. बाकी सगळीकडून बागेला बंदिस्त तटबंदी. मला समोर जमलेले हजारो शीख बांधव, स्त्रिया आणि बालके दिसू लागली. एका बाजूला जनरल डायर उभा. समोर बंदुका सरसावून उभे असलेले सैनिक. कोणतीही पूर्वसूचना न देता डायर ओरडला – “फायर”. आणि फाडफाड गोळ्या सुटू लागल्या. समोर एकच कल्लोळ उडाला. सुटलेली गोळी समोर लहान आहे की मोठा, पुरुष आहे की स्त्रीहे बघत नाही. धडाधड माणसे कोसळू लागली. एकच पळापळ उडाली. माणसे वाट फुटेल तिथे पळत सुटली. वाट होतीच कुठे. तीनच दिशा. चौथ्या दिशेला सैनिक उभे. उरलेल्या तीन दिशांना कडेकोट तटबंदी. स्त्रिया, बालके पायाखाली तुडवली जाऊ लागली. सुटकाच नव्हती. लोकांनी विहिरीत उड्या मारायला सुरुवात केली. तिथे एकमेकांच्या अंगावर पडून लोक जखमी होऊ लागले. अखेर १००० च्यावर जीव घेतल्यावर हा हैवान थांबला. खाडखाड बूट वाजवत डायर आणि सैनिक निघून गेले. उरला होता तो प्रेतांचा खच, रक्ताचा सडा आणि अनेक जखमी आणि वाचलेल्या मुठभर लोकांचा आक्रोश!

समोरचा हिरवागार बगीचा, फुललेली फुलबाग आणि लोकांच्या हसण्या-खिदळण्याच्या आवाजाने मी एकदम भानावर आलो. आता समोर एक टूरिस्ट स्पॉट होता. कालाय तस्मैः नमः. त्याला काही इलाज नाही. काही असो पण पंजाब सरकारने जालियनवाला बाग अतिशय उत्तम ठेवली आहे. आत सतत जळणारी अमर ज्योत आहे. उत्तम असा शहीद स्तंभ आहे. सुंदरसा बगीचा आहे. फोटो आणि माहितीने परिपूर्ण असं म्युझियम आहे. आणि हो, त्यावेळेला गोळ्या लागून भिंतींना जे खड्डे पडले ते ही नीट जपले आहेत. ते पाहिल्यावर मात्र पोटात खड्डाच पडतो. याउलट आपल्याकडे काय परिस्थिती आहे बघा. पंधरा दिवसापूर्वी सकाळमध्ये बातमी आली होती – “गणेश खिंडीतील रस्ता-रुंदीकरणात चाफेकर स्मारकाची शिला अर्धी गाडली गेली”. ती शिलाही काही वर्षांपूर्वी काही तरुणांनी एकत्र येऊन गणेश खिंडीत बसवली होती. ना सरकारला काही खंत ना महापालिकेला काही खेद! महाराष्ट्राची अवस्था “आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय” अशी झाली आहे. आपण आंधळे आहोत हे निश्चित, पण कुत्रे कोण आहेत हे सांगायची गरज आहे का? असो.

जालियानवाला बागेतून सुवर्णमंदिराकडे निघालो. रस्ता अत्यंत अरुंद, अक्षरशः पाउलवाट. मला न उलगडलेले एक कोडे म्हणजे भारतात बऱ्याचशा सुप्रसिद्ध देवळांकडे जाणाऱ्या वाटा अगदी छोट्या, बऱ्याचदा गलिच्छ, गैरसोयीच्या का असतात? एके काळी आक्रमकांपासून बचाव करण्यासाठी त्या उपयोगी असतीलही. पण इतक्या शतकानंतरही त्यात काहीही सुधारणा होऊ नये? गेल्या वर्षी नाथ-द्वारा(राजस्थान) येथे गेलो होतो. अत्यंत श्रीमंत देवस्थान. असणारच म्हणा – गुजराथ्यांचाच देव तो! मध्यमवर्गीय कसा असेल? पण देवळाकडे जाणारा रस्ता म्हणजे हरे राम. आत गेल्यावर मरणाची गर्दी. दर्शनाची व्यवस्था म्हणावी तर अगदीच तकलादू. “नाथ हा माझा, मोही मना” असं म्हणत म्हणत मी देवळापाशी पोहोचलो खरा पण नंतर मात्र “नाही मी बोलत नाथा” असं म्हणत परत फिरलो. आतला नाथही बहुदा “असून नाथ, मी अनाथ” असंच काहीतरी म्हणत असावा.
अशा त्या अरुंद पाउलवाटेने सुवर्णमंदिराशी पोहोचलो. चपला / बूट ठेवण्यची वेगळी आणि सु-व्यवस्था. तिथे अनेक श्रीमंत सरदारजी “कर-सेवा” करतात. म्हणजे चपला / बूट ठेवून घेणे, कुपन देणे आणि चपला / बूट परत करणे ही कामे ते हौसेने करतात. एक वेगळाच पण चांगला प्रकार वाटला. “Ego-busting” चा इतका चांगला प्रकार जगात क्वचितच कोठे असावा.सुवर्णमंदिरात पोहचलो. आणि “प्रथम तुज पाहता जीव वेडावला” अशी अवस्था झाली. अगदी गारुडच झालं म्हणाना. विस्तार्ण असा तलाव. चारही बाजूंना पांढऱ्या शुभ्र रंगांचे गुरुद्वारा आणि त्यांचे भव्य घुमट. आणि मध्यभागी सोन्याचं आणि सोन्यासारखं मुख्य गुरुद्वारा– “हर्मिन्दर-साहिब”. त्या दिवशी बैसाखी होती. त्यामुळे चिकार गर्दी होती. तलावात अनेक भाविक स्नान करत होते. दर्शनाला प्रचंड लांब रांग असल्यामुळे ते हुकलं पण इतर इमारती, अकाल तख्त वगैरे पाहून डोळे निवले. प्रसादाचा पंजाबी शिरा खाल्ला. साजूक तुपाने हात माखला. नंतर तेथील म्युझियम पहिले. साधारण देवळांमध्ये माझा जीव जरा कमीच रमतो. त्यापेक्षा खरा-खुरा घडलेला इतिहास मला जास्त भावतो. त्या म्युझियम मधे अमृतसर आणि लाहोरचा सगळा रक्तरंजित इतिहास पाहायला मिळतो. अमृतसर आणि लाहोर ही जुळी आणि खूप जुनी शहरे. दोन्ही शहरांना समृद्ध आणि तितकाच भीषण असा इतिहास आहे. मुघल आणि मुसलमान आक्रमकांशी शिखांनी अनेक शतके अत्यंत प्रखर असा लढा दिला आहे. वेळोवेळी शिखांवर आणि त्यांच्या गुरूंवर झालेल्या अत्याचारांच्या कहाण्या या म्युझियममधे चित्रबद्ध आणि शब्दबद्ध केल्या आहेत. आजही त्या पाहून जीवाचा थरकाप उडतो. उगाच नाही शीख रफ आणि टफ झाले. उगाच नाही सैन्यदलात शिखांचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामागे फार मोठा इतिहास आणि त्याग आहे हे निश्चित.

सुवर्णमंदिरात खूप वेळ रमलो. अकाल-तख्त च्या इमारतीत जाऊन मंदिरात बसतात तसे बसलो. माझ्यामुळे शशीचे "हर्मिन्दर-साहिब" हुकले पण निदान अकाल तख्तचे दर्शन झाले. पण तुम्हाला खरे सांगतो तिथे भक्तांचे चित्त तख्तावर आणि तेथील गुरु-ग्रंथसाहिब वर होते तर पुजाऱ्याचे लक्ष समोर ठेवल्या जाणाऱ्या दक्षिणेकडे होते. कुठल्याही देवळात / मठात जा ह्यापेक्षा वेगळे दृश्य काय दिसते? आणि वाईट म्हणजे या दोन्हीकडे माझे लक्ष असते.

सुवर्णमंदिरातून बाहेर पडलो तेव्हा टळटळीत दुपार झाली होती. बाहेर चौकात अत्यंत जुन्या आणि लोकप्रिय लस्सीवाल्याचे दुकान होते. आमची पंजाबमधली पहिली लस्सी. अर्धा लिटर लस्सी आणि वर तेवढाच फेस. ही लस्सी वॉशिंग मशीन मधून फिरवून काढतात म्हणजे बघा. एका लस्सीत आम्ही गार झालो. दोन्ही अर्थाने!

शशीचे लक्षजवळ पास उभ्या असणाऱ्या taxi कडे गेले. शशिने त्याच्याशी त्या आणि दुसऱ्या दिवशीच्या फिरण्याचा करार करून टाकला आणि आम्ही वाहनात स्थानापन्न झालो. पोटपुजेची वेळ झाली होती. अस्सल पंजाबी हॉटेल दाखवण्याची सारथ्याला विनंती केली आणि त्यानेही झकास जागा दाखवली. खरे – खुरे पंजाबी जेवण मिळाले. आपण इथे जे पंजाबी जेवण खातो ते खऱ्या पंजाबी जेवणाचे खास उडपी विडंबन आहे (काही अपवाद वगळता). तेथील पराठा, दही, छोले खाऊन तबियत खुश झाली. पापड आणि लोणचे तर इतके आवडले की ते कुठे मिळेल याची चौकशी चक्क हॉटेलच्या मालकीणीकडे केली. तिने सांगितल्याप्रमाणे जवळच असलेल्या बाजारपेठेत धाव घेतली. एक छोटेखानी वाण्याचे दुकान दिसले. आत एक बहनजी होत्या. एका वयस्कर सरदारजीचा फोटो हार घालून समोर भिंतीवर लावला होता. तो त्यांच्या "ह्यांचा" असावा असं मला उगाचच वाटलं. बाईनी लोणचे पापड वगैरे काढून दिले. बिलाचा आकडा सांगितल्यावर नेहमीप्रमाणे शशिने सूत्रे हाती घेतली आणि घासाघीस सुरु केली. बाईने नम्रपणे नकार दिला. मी पण "जाऊ दे रे, गरजू दिसते आहे. रास्तच भाव लावला असणार." असे सांगून त्याला गप्प केले. दुसऱ्या दिवशी मार्केटमधे आम्हाला तिने २५ टक्के किंमत जास्त लावल्याचा साक्षात्कार झाला आणि मी शशीला साष्टांग दंडवत घातला. साधारणतः "पु.ना.गाडगीळ" आणि "चितळे बंधू" ही दुकाने सोडून इतर ठिकाणी शशी घासाघीस का करतो याचा उलगडा झाला.

हॉटेलवर परतेपर्यंत ३ वाजले होते. पुढचा कार्यक्रम होता – वाघा बॉर्डर! “तिथे प्रचंड गर्दी असते. लवकर गेले नाही तर बसायला जागा मिळत नाही” अशी “आगाऊ” सुचना आम्हाला ड्रायव्हरने दिली होती. त्यामुळे सामान हॉटेलवर टाकून पटकन निघालो. अमृतसर शहरापासून वाघा बॉर्डर साधारण ४० कीलोमीटर दूर असावी. रस्ता चांगला आणि रुंद होता. त्यामुळे पोचायला फार वेळ लागला नाही. जाताना अनेक भावना मनात उचंबळून येत होत्या. एकाच खंडप्राय देशाचे दोन तुकडे केलेले. “अमृतसर-लाहोर” म्हणजे “पुणे-पिंपरी-चिंचवड”. माहेर इकडे तर सासर तिकडे. मामा / मावश्या तिकडे आणि काका / आत्या इकडे अशी परिस्थिती फाळणीपूर्वी असणार. अर्थात त्या वेळेला “इकडे” आणि “तिकडे” असा भेद होताच कुठे म्हणा. जीनांच्या हट्टाने आणि इंग्रजांच्या धूर्तपणामुळे हे दोन तुकडे झालेले. एक जखम – कायम भळभळणांरी! बॉर्डर जवळ आली आणि रस्त्यावर पाटी दिसली – “वाघा ५ कीलोमीटर, लाहोर ३० कीलोमीटर, कराची ** कीलोमीटर” आणि अंगातून एकच शिरशिरी गेली. आपण पाकीस्तानच्या इतके जवळ आहोत – आणि तरी इतके लांब की एकमेकांच्या देशात जाणे सुद्धा महा-कर्मकठीण! त्या पाटीचे फटाफट फोटो काढले. पाहता पाहता बॉर्डर आली आणि ट्रकच्या लांबलचक रांगा दिसू लागल्या. ड्रायव्हरने माहिती दिली की हे सगळे ट्रक भारतातून “त्या तिथे, पलीकडे, तिकडे” पाकीस्तानात हर तऱ्हेचा माल घेऊन चालले आहेत. तिथे फार काही बनतच नाही. (पाकीस्तानी राज्यकर्ते सगळ्या जगाला सतत “बनवतात” म्हणा). तिकडूनही तसेच ट्रक भारतात येतात – बरेचसे सुका मेवा घेऊन. गंमत म्हणजे तिकडचे सगळे ट्रक म्हणजे १९५०-६० सालातील टोयोटा किंवा मर्सिडिझ मेकचे. याचा अर्थ उघड आहे. पाकीस्तानात वाहन उद्योग नसावाच. पाकीस्तानची सगळी शक्ती भारतविरोधातच खर्च पडते. आणि विद्वेषाच्या खत पाण्यावर निवडुंगच उगवणार– कल्पवृक्ष कसा बहरेल?

बॉर्डर आली आणि Border Security Force (BSF) चा अंमल दिसू लागला. ड्रायव्हरने सांगितल्याप्रमाणे तिथे प्रचंड रांग आणि गर्दी होती. काही हजार माणसे असावीत. बॉर्डरच्या अलीकडे आणि पलीकडे बसण्यासाठी स्टेडीयम सारखी व्यवस्था केलेली. स्टेडीयमचे दोन भाग केलेले. मध्ये रस्ता ज्यावर BSF  चे जवान उभे. आपल्या बाजूला पाच एक हजारांचा जमाव होता आणि तिकडे हजारभर. दोन्ही बाजूला भव्य आणि भक्कम दरवाजे. मधे “No man’s land”. प्रेक्षकातील पुरुष मंडळीना मधील रस्त्यावर प्रवेश नव्हता. पण बायका-मुली आणि लहान मुले यांना मात्र झेंडा घेऊन बॉर्डर पर्यंत जाऊन यायची परवानगी होती. त्यांच्या उत्साहाला अगदी उधाण आले होते. त्या झेंडा घेऊन बॉर्डरपर्यंत धावत जायच्या आणि बॉर्डरपाशी “भारतमाता की जय” म्हणून परत यायच्या. काही मुली ग्रुप करून नाचत होत्या, गात होत्या. बसलेली पुरुष मंडळी जोरदार आवाजात आणि एकसुरात भारताच्या विजयाच्या आणि गौरवाच्या घोषणा देत होती. या सगळयाचे “दिग्दर्शन” करत होता BSF चा एक जवान.

त्याच्या हातात माईक होता आणि त्याच्या ताला-सुरावर सगळे नारे देत होते. हेच दृश्य पलीकडे होते. तिकडे मंडळी कमी असल्यामुळे एकंदर त्यांचा आवाज आपल्यापेक्षा कमी होता एवढाच काय तो फरक. हा सगळा दंगा चालू असताना BSF चे जवान परेडची तालीम करत होते. नेहमीचीच परेड पण फरक इतका की पुढचा पाय परेड करताना खांद्यापर्यंत वर घ्यायचा. यात काय लॉजिक होते कोण जाणे? कदाचित "त्यांना" बुटाचा तळवा दाखवणे वगैरे काहीतरी प्रकार असावा. नंतर रीतसर परेड झाली. आपली चार जवान मंडळी खाड खाड बूट वाजवत आणि पाय आकाशात उडवत द्वारापर्यंत जायची आणि परत यायची. तिकडेही तसेच. अशा वेळेला आरोळ्या आणि आरडा-ओरडा याला उधाण यायचे आणि त्याचेही दिग्दर्शन आपला जवान व्यवस्थित करत होता. शेवटी सूर्य अस्ताला जायची वेळ झाल्यावर परेड थांबली, दोन्ही दारे उघडली. दोन्हीकडील निवडक मंडळींनी एकमेकाला हस्तांदोलन केले आणि आपापले ध्वज खाली उतरवले.

आपले सैन्य, त्यांचे शौर्य, त्यांचा त्याग याचा मला प्रचंड अभिमान आहे. तसेच पाकीस्तानी राज्यकर्त्यांची आणि सैन्याची मानसिकता आणि त्यांच्या आपल्या विरोधातील सततच्या कारवाया याची चीड पण आहे. तरीसुद्धा वाघा बॉर्डर वरील एकंदर प्रकार मला तरी फारसा भावला नाही. मला ती एक एन्टरटेनमेंट वाटली. जी दोन्ही देशातील सामान्य नागरिकांना एकमेकांविरुद्ध भड्कवते. युरोपमधे अनेक देशात एकमेकाविरुद्ध जीवघेण्या लढाया झाल्या. महायुद्धे झाली. पण त्यानंतर प्रगतीची कास धरून एकमेकांच्या सहकार्याने त्यांनी वाटचाल केली आणि समृद्धी मिळवली. त्यांच्या बॉर्डर वर असे प्रकार चालत नाहीत. याचे कारण त्यांना वर्तमानाचे भान आहे. या उलट आपण आणि पाकीस्तान अनेक दशके ही जखम कुरवाळत बसलो आहोत आणि ती बरी कशी होणार नाही त्याची काळजी घेत आहोत असे मला वाटते!

श्रीधर पाठक
shreedhar@natupathak.com

# मराठी अमृतभाषा आहे.

मराठी ही अमृतवाणी आहे. खुद्द ज्ञानोबामाऊलींनी सांगितलंय.
ज्यांना ज्यांना मराठीचं पुढे काय होणार याची चिंता लागलीय त्यांना चोख उत्तर द्यायला नवीन पिढीतले हजारो लोक इंटरनेटवर मराठी साहित्य उपलब्ध करून देण्याचं काम करत असतात. त्यातले आम्ही एक. आम्ही मिडियम निवडलंय ई मेल्सचं. आणि आज आमच्या प्रत्येक पुस्तकाची ई मेल दिड लाख लोकांना जाते. ही काही फ़ार मोठी संख्या आहे? अजिबात नाही. बारा कोटी मराठी माणसांच्या, साताठ कोटी साक्षर मराठी माणसांच्या मानाने ही संख्या अगदीच नगण्य आहे. तुम्हाला नाही असं वाटत?
आमचं स्वप्न आहे प्रत्येक मराठी माणसापर्यंत पुस्तक नेण्याचं. उत्तमातलं उत्तम साहित्य. जागतिक दर्जाचं. तेही विनामूल्य.
अशक्य आहे?
तुम्ही थोडीशी मदत कराल तर हे अजिबात अशक्य नाही.

पैसे नकोत हो. देणगी जाहिरात वगैरे अजिबात नको.
फ़क्त तुमच्या ओळखीच्या एक दोन चार दहा बारा वीस पन्नास शंभर लोकांचे आयडी द्या बरं. esahity@gmail.com या मेल आयडीला ते पाठवा. तुमचे सुशिक्षित नातेवाईक, मित्र, सहकारी, बॉस, सहप्रवासी. कोणाच्याही. प्रत्येक मराठी माणसाच्या आवडीचं आम्ही काही ना काही देतच असतो. तेही विनामूल्य. तेही उत्तम क्वालिटी.
फ़क्त एवढंच करा तर खरं भिडू. आणि मग आपण भिडूया त्या इंग्रजीच्या महासत्तेला. या वर्षात बारा लाख वाचकांचा पल्ला गाठायचा म्हणजे गाठायचाच.
कराल ना एवढं?
करायला गेलं तर अशक्य काहीच नसतं हो!

टीम ई साहित्य प्रतिष्ठान